**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्र. ८१/२०१९**

**तक्रारकर्ता श्री.हरेश कनप्पा चौधरी.**
**रा.पिंपरी यादगिरे, पो.कवठा, बहाडे, ता.जि.अमरावती**
**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्रामपंचायत कार्यालय, विझोरा, ता.बार्शिटाकळी, जि.अकोला.**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती बार्शिटाकळी, ता.बार्शिटाकळी, जि.अकोला.**
**तक्रार सुनावणी दिनांक - २५.०७.२०२४.**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | उपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | अनुपस्थित |

तक्रारकर्ता यांनी दि.०२.१२.२०१९ रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ (१)(ग) अन्वये तक्रार दाखल करुन, दि.१८.१२.२०१८ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसाच्या विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही तसेच माहिती देखील पुरविली नाही, असे कारण नमुद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीवर आज दि.२५.०७.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.जया मधुकर माणिकदास ह्या उपस्थित आहेत.

अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.१२.२०१८ रोजी रितसर माहितीचा अर्ज दाखल करुन, मौजे विझोरा ता.बार्शिटाकळी येथील मालमत्ता क्र.३० हे दानाप्पा देवमन चौधरी यांच्या पुर्वीचे मालक कोन होते व त्यांच्या नावाने असलेले क्षेत्रफळ त्याची संपूर्ण माहिती तसेच गाव नमुना ८अ ची प्रतीची माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसाच्या विहीत मुदतीत माहितीचे प्रदान न झाल्याने तक्रारकर्त्याने आयोगाकडे थेट तक्रार दाखल केल्याचे दिसून येते.



राज्य माहिती आयोग यांचे ... अमरावती विभाग, अमरावती

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे, तक्रारकर्ता यांचा युक्तीवाद व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या खुलाश्यावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता श्री.चौधरी यांनी दाखल केलेल्या दि.१८.१२.२०१८ रोजीच्या जोडपत्र-अ च्या अनुषंगाने संबंधीत तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आली. तसेच अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील सुनावणी दरम्यान माहितीचा एक संच त्यांना देण्यात आला व समाधान झाले असल्याचे नमूद केलेले आहे, असे आज झालेल्या सुनावणीत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. तसेच सन १९९२ पासून तक्रारकर्ता यांनी मौज विझोरा येथील मालमत्ता क्र. ३० विषयी केलेली विचारणा वरील मालमत्ता ही त्यांच्या काकाच्या नावानेच असल्याचा रेकॉर्ड ग्रामपंचायतच्या अभिलेखात उपलब्ध असून कलम २ (च) प्रमाणे जी माहिती उपलब्ध आहे तीच देणे अपेक्षीत असल्याचेही नमूद केलेले आहे. मात्र तक्रारकर्ता यांच्या म्हणण्यानूसार वरील माहिती ही बनावटी, दिशाभूल करणारी व अपूर्ण असून, संशयास्पद पध्दतीने वरील मालमत्ता ही त्यांच्या काकांच्या नावाने करण्यात आली असून, यातील कागदपत्रे ही जाणुन बुजुन गहाळ केली असल्याचाही अरोप त्यांनी आज झालेल्या सुनावणीत केला आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, उपरोक्त तक्रार नस्तीबध्द करीत असतांना विद्यमान गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शिटाकळी यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ चे तरतुदीनूसार संबंधीत ग्रामपंचायत विझोरा येथील अभिलेखाचे तपासणी करुन तक्रारकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जोडपत्र-अ नूसार उपलब्ध आहे किंवा कसे याची तपासणी करुन यातील कागदपत्रे जाणुन बजून गहाळ केली असल्याचे निदर्शनास आल्यास अभिलेख अधिनियम, २००५ चे तरतुदीनूसार योग्य ती कार्यवाही करण्याची तसेच प्रस्तुत प्रकरणी तक्रारकर्ता यांचे म्हणण्यानूसार ज्या कागदपत्रांच्या आधारे फेरफार करण्यात आली आहे तीच नेमकी गहाळ झाली असल्याने चौकशी करुन कार्यालयीन अभिलेखात उपरोक्त दस्तऐवज आढळून आल्यास ती तक्रारकर्ता यांना विनामुल्य प्रदान करावी. अथवा संबंधीत ग्रामपंचातीने ज्या व्यक्तीच्या नावाने वरील मालमत्ता आहे, ज्या कागदपत्रांच्या आधारे त्यांचे नावे करण्यात आली याबाबतीतील एक कागदांचा संच संबंधीत व्यक्तीकडून मागवून त्याची एक साक्षांकीत प्रत तक्रारकर्ता यांना प्रदान करण्याचे निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.

## आदेश

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २५.०७.२०२४**

जावक क्रमांक ७२८६ दिनांक 30 OCT 2024

Vishal D.Ingale-२०२४/

30 OCT 2024